प्रेरणा को-ऑपरेटिव्ह बँक लि.

प्रेरणा आमची प्रगती तुमची

लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे - ४११०३३.

# प्रेरणा

## को - ऑप. बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय

लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे - 411 033.

फोन : 9075028001 / 9075028002




नको बँकेत पोहचण्याची चिंता,
नको पैसे पाठविण्याची काळजी,
नको कागदपत्रे भरण्याची कसरत,
आता बँकींग आपल्या मुठीत.



प्रेरणा नव्या युगाची ...
आधुनिक तंत्रज्ञानाची ...

आता आपण कोठेही असा,
वेळ कोणतीही असू दे, भारतामधे कोणालाही पैसे दयावयाचे असुदेत.
आपण विनासायास पैसे ट्रान्सफर करू शकाल.

## ही सेवा वापरण्यासाठी आपणाकडे खालील गोष्टी हव्यात.

१. इंटरनेट सुविधा म्हणजेच इंटरनेट डेटा पॅक असलेला स्मार्ट मोबाईल फोन असावा.
२. आपला फोन नंबर प्रेरणा बॅकेमधील आपल्या अकौंटमध्ये रजिस्टर झाला असावा. रजिस्टर नसल्यास प्रथम बॅकेत अर्ज करून हा नंबर रजिस्टर करून घ्या.

## मी सुरवात कशी करू...?

१. आपल्या मोबाईल फोन मधील होम स्क्रीनवर असलेल्या प्ले स्टोअर ॲप हया चिन्हावर क्लिक करा.
२. सर्च फॉर ॲप्स Search for Apps या टॅबमध्ये प्रेरणा बँक असे टाईप करा.
३. खाली प्रेरणा बँक मोबाईल ॲप दिसेल त्यावर क्लिक करा. त्यानंतर इन्स्टॉल या पर्यायावर क्लिक करा. सदरचे ॲप डाऊनलोड होण्यास सुरूवात हाईल.
४. डाऊनलोड झालेले ॲप ओपन करा. ॲप्लीकेशन वापरण्यापुर्वी आपणास या वापराचे नियम दाखविले जातील. ते वाचुन स्वीकारा आणि Send SMS वर क्लिक करा.
५. आपल्या मोबाईलमध्ये जर दोन सीम कार्ड असतील तर बॅकेकडे तुमच्या खात्याला रजिस्टर केलेल्या नंबरचे सीम कार्ड निवडा.
६. Send SMS वर क्लिक केल्यावर OTP व्हेरिफिकेशन केले जाते.
७. मोबाईल बॅकींग ॲप लॉगीन करण्यासाठी सर्वप्रथम लॉगीन पिन (MPIN) टाकुन त्याची पुष्टी करून घ्या. त्यानंतर मोबाईल बँकींग व्यवहार करण्यासाठी ट्रॅन्झॅक्शन पिन (TPIN) टाकुन त्याची पुष्टी करून घ्या.
८. प्रेरणा बँकेचे मोबाईल बँकींग ॲप्लीकेशन सुरू होईल त्याद्वारे बँकींगचे सर्व व्यवहार करू शकाल.
९. मोबाईल बॅकींग ॲप मार्फत आयएमपीएस, नेफ्ट या व्दारे फंड ट्रान्सफर करू शकता. एटीएम कार्ड हरवल्यास ते कार्ड तुम्ही मोबाईल ॲपव्दारे ब्लॉक करू शकता व स्वतःच्या अकौंटचे मिनी स्टेटमेंट देखील पाहु शकता. तसेच ॲपमधील इतर सेवांचा लाभ घेऊ शकता.

## प्रेरणा बँकेचे मोबाईल ॲप्लिकेशन वापरण्यापुर्वी खालील गोष्टींची काळजी घ्या.

१. आपल्या मोबाईलवर ॲन्टीव्हायरस सॉफ्टवेअर असावे म्हणजे आपल्या मोबाईल मधील डेटा चुकीच्या व्यक्तींच्या हातात जाणार नाही.
२. मोबाईल बॅकींग वापरत असताना आपण युजर आयडी, मोबाईल पासवर्ड (MPIN) व ट्रॅन्झॅक्शन पासवर्ड (TPIN) कोणालाही सांगु नका फक्त आपल्या जवळच ठेवा.
३. आपणास मोबाईल बँकींग पासवर्ड किंवा OTP विचारणारे कोणाचेही फोन आले तरी त्यास उत्तर देऊ नका.
४. आपला मोबाईल त्रयस्थ व्यक्तीच्या हातात देवु नका.
५. सुरक्षिततेच्या दृष्टीने मोबाईल बँकींग ॲपमध्ये आपला व्यवहार पुर्ण झाल्यानंतर ॲप्लीकेशन मधुन लॉग आऊट करा.
६. आपण रक्कम ट्रान्सफर करताना (आयएमपीएस/नेफ्ट) रक्कम मिळणाऱ्याच्या खात्यांची माहिती अचुक भरा. माहिती चुकीची भरल्यास रक्कम दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यास जमा होऊ शकते.

## प्रेरणा बँकेचे मोबाईल ॲप्लिकेशन वापरण्यासाठीचे महत्वाचे नियम.

१. ग्राहकास आयएमपीएस ट्रॅान्झॅक्शन चे लिमिट हे प्रत्येकी दिवसाला रक्कम रू. १०,००० तसेच नेफ्ट चे लिमिट हे प्रत्येकी दिवसाला रक्कम रू. ५०,००० देण्यात आलेले आहे.सदरचे लिमीट खातेदार बॅकेमध्ये स्वतंत्र अर्ज देवुन वाढवुन घेऊ शकतो.
२. मोबाईल बँकीग ॲप सुविधेव्दारे एकदा केलेला व्यवहार हा बदलता येत नाही वा रद्द ही करता येत नाही.
३. मोबाईल बँकींग ॲप सुविधा वापरांतुन कोणत्याही प्रकारचा फ्रॉड किंवा नुकसान झाल्यास बँक जबाबदार असणार नाही.
४. अन्य नियमांसाठी बॅकेच्या वेबसाईटला भेट दया किंवा आपल्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधावा.

**PRERANA**
CO-OP. BANK LTD.

प्रेरणा मोबाईल बँकिंग ॲप,
आपल्या जलद सेवेसाठी...
Customer Care No. 7721 800 800